# सबाल्टर्न लेखनप्रवाह

**डॉ. अनंत रिंढे**
इतिहास विभाग प्रमुख
सहयोगी प्राध्यापक
यशवंत महाविद्यालय सेलू, जिल्हा वर्धा.

---

***सारांश :***

*आधुनिक इतिहास लेखनात नवीन प्रवाहांचा उदय झाला त्या सर्वपैकी वेगळा इतिहास प्रवाह म्हणजे सबाल्टर्न हा इतिहास प्रवाह आहे. सबाल्टर्न हा शब्द सर्वप्रथम इटाली मधील अंतानियो ग्रामची यांनी वापरला. भारतीय समाज स्थितीच्या संदर्भात 1980 च्या दशकाच्या सुरुवातीला सबाल्टर्न या संकल्पनेचा अवलंब डॉ. रणजीत गुहा यांनी केलेला आपणास दिसून येतो. सबाल्टर्न लेखकांच्या दृष्टिकोनातून वंचित समाजाच्या स्वावलंबनावर भर देणे हा हेतू नाही, तर वंचित समाजाचा इतिहास लिहिला पाहिजे, वंचित समाजातील जिवंतपणा लक्षात घेतला पाहिजे, कनिष्ठ, तुच्छ, निर्बल व्यक्ती शेवटी मनुष्यच असतो त्यालाही जाणीव आहे, त्यालाही जीवन विचार प्रगतीवर जाण्याची इच्छा आहे, त्यामुळे त्याला इतिहासात स्थान मिळाले पाहिजे ही भूमिका घेऊन अंतानिओ ग्रामची, रणजीत गुहा, शहीद अमिन, सुमित सरकार, एन. के. चंद्रा, पार्थ चटर्जी, गायत्री चक्रवर्ती स्पिवाक यांनी समविचारी अभ्यास मंडळ स्थापन केले. यातूनच 'सबाल्टर्न स्टडीज' उदयास आले व त्यांनी इतिहास लेखन केल्याची दिसून येते.*

**बीज संज्ञा :**

सबाल्टर्न शब्दाचा अर्थ, सबाल्टर्न इतिहास लेखनाची वैचारिक बैठक, सबाल्टर्न इतिहास लिखाण करणारे लेखकांची मते

---

**संशोधनाची उद्दिष्टे :**

आजवरचे इतिहास लेखन अभिजन केंद्रित झालेले आहे. भारतीय राष्ट्रीय चळवळीतील त्यांचेच कार्य अधोरेखित झालेले आहे, वास्तविक पाहता कोणत्याही व्यापक चळवळीत जनसमुहांचा, गटांचा सहभाग महत्त्वाचा असतो परंतु आजवरच्या इतिहास लेखकांनी याची दखल न घेता त्यांना श्रेयापासून वंचित ठेवल्याचे दिसून येते. तळातल्या माणसांचे कार्य अधोरेखित करणे हे या प्रस्तुत संशोधनाचे उद्दिष्ट आहे.

**प्रस्तावना :**

आधुनिक इतिहास लेखनात वसाहतवादी, राष्ट्रवादी, मार्क्सवादी इतिहास लेखन प्रवाहांचा उदय झाला. या तिन्ही इतिहास लेखन प्रवाहापेक्षा वेगळा इतिहासप्रवाह म्हणून सबाल्टर्न हा इतिहास लेखनप्रवाह उदयास आल्याचे दिसून येते. सबाल्टर्न या इतिहासलेखन प्रवाहाने वसाहतवादी, राष्ट्रवादी, मार्क्सवादी या पारंपारिक

इतिहासलेखन प्रवाहमधील अभिजनवादी प्रवृत्तीला तिलांजली देऊन वेगवेगळया तत्त्वांचा व पद्धतीशास्त्रांचा अवलंब करून समाज तळातून इतिहास लिहिण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते.

सबाल्टर्न विचार प्रवाहाचा उदय वस्तूत: दक्षिण आशियाई देशांच्या इतिहासाच्या संदर्भात झालेला दिसून येतो. दक्षिण आशियाई देशावर द्वितीय महायुद्धापूर्वी बरीच वर्ष वसाहतवादी पाश्चात्य राष्ट्रांची सत्ता होती. या प्रदीर्घ कालावधीत त्या त्या देशांच्या स्थानिक लोकांनी अनेकदा विदेशी शासनाला विरोध करून उठाव केल्याचे दिसून येते. अशा उठावात जनसामान्य लोकांचा मोठ्या प्रमाणात सहभाग होता परंतु इतिहास लेखनात त्यांच्या सहभागाचा उल्लेख येत नव्हता. अशा पद्धतीच्या उठावातील समाजाच्या तळागाळातील जनसमुहांच्या कार्याची माहिती करून घेतल्याशिवाय तत्कालीन इतिहासाचे सम्यक दर्शन होणार नाही या धारणेतून असे संशोधन व लिखाण करण्याच्या हेतूने ' Centre of south Asian cultural studies ' या संस्थेची पायाभरणी करण्यात आली. डॉ. रणजीत गुहा यांनी या संस्थेच्या स्थापनेसाठी पुढाकार घेतला होता. डॉ. रणजीत गुहा यांनी इतिहासाच्या या दृष्टिकोनांबाबत काही भारतीय इतिहास अभ्यासकांशी चर्चा केली. ब्रिटिशांच्या भारतावरील वासाहतीक शासनकाळातील स्वातंत्र्य चळवळीचे नव्या दृष्टिकोनातून अध्ययन व मांडणी करण्याची गरज प्रतित झालेले काही इतिहासकारांनी एकत्र येऊन सामूहिकरित्या इतिहासक्षेत्रात नव्या प्रयोगाचे पर्व सुरू केले.

'सबाल्टर्न स्टडीज' या शीर्षकाचा इसवी सन 1982 या वर्षी डॉ. रणजीत गुहा यांनी एक लेखसंग्रह प्रकाशित केला.समविचारी अभ्यासकांनी एकत्र येऊन असा सामूहिक उपक्रम सुरू करण्याचा इतिहास क्षेत्रातील हा अभिनव



प्रयोग होता. सबाल्टर्ण या संज्ञाने प्रसिद्धीस आलेला इतिहासलेखन प्रवाह भारतात विसाव्या शतकाच्या शेवटच्या दोन दशकात प्रचलित झाल्याचे आपणास दिसून येते. सबाल्टर्न इतिहास लेखन प्रवाहाने परंपरागत इतिहास लेखनाला छेद देऊन भारतीय इतिहास लेखनाला नवी दिशा दिली.

डॉ. रणजीत गुहा यांनी पुरस्कृत केलेल्या सबाल्टर्न प्रवाहाचा तात्विक आधार अंतानियो ग्रामची या इटालियन मार्क्सवादी विचारवंतांच्या लेखनात आढळून येतो.

सबाल्टर्न हा शब्द सर्वप्रथम इटालीच्या अंतानियो ग्रामची यांनी वापरला. सबाल्टर्न म्हणजे जनसामान्य आणि त्याचा इतिहास. सबाल्टर्न ही संकल्पना धुरीनत्व नसलेल्या वर्गांना ते लागू करतात. 1980 च्या दशकाच्या सुरुवातीला डॉ. रणजीत गुहा यांनी सर्वप्रथम भारतीय समाजस्थितीच्या संदर्भात सबाल्टर्न संकल्पनेचा अवलंब

केलेला दिसून येतो. वरिष्ठाच्या खालचा वर्ग तसेच स्त्रियांमधील खालच्या थरातली स्त्री या सर्वअंगाने असणारा वर्ग म्हणजे सबाल्टर्न होय.

सबाल्टर्न हा शब्द इटालीच्या लष्करातील निम्मस्तरावरील कॅप्टनच्या पदाखाली असणाऱ्या दुय्यम अधिकाऱ्याचा निर्देश करतो. या शब्दाला ग्रामचीला अभिप्रेत असलेला अर्थ असा की लष्करी मोहिमेमध्ये प्रत्यक्ष लढण्याचे काम हा दुय्यम अधिकारी करतो, त्याच्या सक्रिय सहभागाखेरीज कोणतीही मोहीम अमलात येत नाही. परंतु लष्करी मोहिमांच्या यशाचे श्रेय मात्र नेहमी लष्कराचे नेतृत्व करणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्याला दिले जाते. कोणत्याही सामूहिक कार्यात, चळवळीत, उठावात भिन्न समाज गटांचा सहभाग महत्त्वाचा असतो परंतु या मोलाच्या सहभागाच्या श्रेयापासून त्यांना वंचित ठेवल्या जाते. त्यांच्या कार्याचा साधा उल्लेखही केला जात नाही. अंतानियो ग्रामची यांचा हा विचार डॉ. रणजीत गुहा यांनी स्वीकारला आणि तो इतिहासाच्या अध्ययनाला लागू केला. समाजातील वंचित समूहाचा किंवा गटांचा इतिहास अभ्यासणाऱ्या नव्या इतिहास प्रवाहाचे सबाल्टर्न असे नामकरण केले गेले.

सबाल्टर्न इतिहास लेखनामागील वैचारिक बैठक डॉ. रणजीत गुहा यांनी 'सबाल्टर्न स्टडीज' च्या पहिल्या अंकाच्या आठ पानी प्रस्तावनेत विशद केली आहे. त्यातून सबाल्टर्न च्या वैचारिक भूमिकेची वैशिष्ट्ये स्पष्टपणे निदर्शनास येतात. आजवरच्या इतिहासकारांनी लिहिलेला इतिहास एकांगी आहे, पक्षपाती आहे, वास्तवाचे दर्शन न घडविणारा व म्हणून अनैतिहासिक आहे. समाजाच्या निम्मस्तरावरील गटांना, जनसमुहांना त्यांच्या इतिहासातील वाजवी स्थानापासून या इतिहासाने वंचित ठेवले आहे, ही उणीव भरून काढणे हे सबाल्टर्न इतिहास प्रवाहाचे मुख्य उद्दिष्ट आहे.

सबाल्टर्न इतिहासलेखनाने सुरुवातीला ब्रिटिश शासन काळातील शेतकरी, कामगार, आदिवासी इत्यादींच्या उठावांचे, त्यांच्या भूमिकांचे विश्लेषण करण्यावर लक्ष केंद्रित केले. स्वातंत्र प्राप्तीच्या काळातील विषयानंतर स्वातंत्र्योत्तर काळातील समस्याकडे ते वळल्याचे सबाल्टर्न स्टडीच्या चौथ्या अंकापासून स्पष्ट होते. या इतिहास लेखनप्रवाहाने आजवर दुर्लक्षित राहिलेल्या विषयांकडे अभ्यासकांचे लक्ष आकर्षित केले आहे व दुर्लक्षित समाज गटांना इतिहासात स्थान मिळवून दिले आहे हे लक्षात घेतली पाहिजे.

डॉ. रणजीत गुहा यांनी इतिहास हा राज्यशासन व महान व्यक्ती यावर केंद्रित झाला ही परंपरागत इतिहास लेखनाची चौकट मोडून इतिहासकारांनी नव्या दिशेने इतिहास लेखन करण्याची गरज ते प्रतिपादित करतात. डॉ. रणजीत गुहा यांनी भारतीय इतिहास लेखनाला नवी दिशा देण्याचे कार्य केल्याचे दिसून येते. डॉ. रणजीत गुहा यांनी इतिहास लेखनातील अभिजनवादाला नकार दिला. त्यांनी राष्ट्रवादी,मार्क्सवादी व साम्राज्यवादी इतिहास लेखनातील अभिजनवाद चव्हाट्यावर आणल्याचे दिसून येते. त्यांनी तळातील माणूस केंद्रस्थानी ठेवून इतिहास लेखन केले.

असहकार चळवळ सुरू असताना 05 फेब्रुवारी 1922 रोजी उत्तर प्रदेशातील चौरीचौरा या गावात जी हिंसक घटना घडली त्या हिंसक घटनेशी संबंधित असलेल्या भिन्न समाजाच्या गटांची मनोभूमिका आणि भगवान

अहिर या सेवानिवृत्त सैनिकाला झालेली मारहाण याचे इतिहासलेखन डॉ. शहीद अमीन यांनी केल्याचे दिसून येते. खेडा किसान आंदोलन, अहमदाबाद येथील गिरणी कामगार आंदोलन ही महात्मा गांधी यांच्या नेतृत्वात झाले. या आंदोलनातील विविध गटांची चिकित्सक तपासणी डॉ.सुमित सरकार यांनी केल्याचे दिसून येते.

**निष्कर्ष :**

सबाल्टर्न इतिहास प्रवाह हा इतर इतिहासप्रवाह पेक्षा अनेक बाबतीत वेगळा आहे. इतर प्रवाह ही महत्त्वाच्या व्यक्तीला, त्यांच्या विचाराला महत्त्व देतात परंतु सबाल्टर्न इतिहास प्रवाह आपल्याला सर्वसामान्य, उपाश्रीत जनतेची माहिती देतो. सबाल्टर्न इतिहास प्रवाह हा महत्त्वाच्या व्यक्तीला, विचाराला महत्व न देता जनसामान्यांची थीम आपल्यासमोर उभी करतो. सबाल्टर्न या इतिहास लेखन प्रवाहाने भारतीय इतिहासाच्या धारेपासून तुटलेल्या उपाश्रीत जनसामान्य वर्गांचा इतिहासात आपल्यासमोर आणला हेच खरे भारतीय इतिहासाला सबाल्टर्न प्रवाहाचे योगदान आहे.

सबाल्टर्न या इतिहास लेखन प्रवाहने वसाहतवादी, राष्ट्रवादी, मार्क्सवादी या पारंपारिक इतिहास लेखनप्रवाहामधील अभिजनवादी प्रवृत्तीला तिलांजली देऊन वेगवेगळ्या तत्त्वांचा व पद्धतीशास्त्रांचा अवलंब करून समाजतळातून इतिहास लिहिण्याचा प्रयत्न केल्याचे दिसून येते.

**संदर्भ :**


- कोठेकर शांता, इतिहास तंत्र आणि तत्वज्ञान, साईनाथ प्रकाशन, नागपूर.
- गुप्त मानिक लाल, इतिहास स्वरूप, अवधारानाये एव उपयोगिता , एटलाटिक पब्लिशर्स, नई दिल्ली.
- देव प्रभाकर, इतिहासाशास्त्र लेखन परंपरा, संशोधन आणि अध्ययन , ब्रेन टोनिक प्रकाशन गृह, नाशिक.
- सरदेसाई बी.एन., इतिहास लेखन पद्धती , भडके प्रकाशन ,कोल्हापूर.
- गाठळ एस. एस., इतिहासाचे तत्त्वज्ञान , कैलास पब्लिकेशन, संभाजीनगर .


,